# प्रेसनोट

धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत शिल्लक लक्षांक (641) वाटपाकरीता, जिल्हा स्तरीय निवड समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार, यवतमाळ जिल्ह्यातील वणी, मारेगांव व झरी जामणी हे तीन तालुके वगळता उर्वरित तेरा तालुक्यामधील यापुर्वी वगळलेल्या गांवामधुन इच्छुक लाभार्थ्याकडुन **दिनांक** 28/06/2018 **ते** 10/07/2018 **पर्यंत** ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. या मुदतीत प्रस्तावित गावांतील इच्छुकं लाभार्थ्यांकडुन अत्यंत अल्प अर्ज प्राप्त झाल्याने अर्ज मागविण्याचे मुदतीत **दिनांक** 21/7/2018 पर्यंत वाढ करण्याचे ठरविण्यात आले आहे. याकरीता ऑनलाईन अर्ज भरण्याच्या संदर्भात तेरा तालुक्यातील प्रस्तावित गावांची यादी व लक्षांक **http://egs.mahaonline.gov.in** वर उपलब्ध आहे. लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटी खालील प्रमाणे आहे.

अ) ज्या शेतकरी कुटूंबात आत्महत्या म्हणून आपत्ती आली आहे व ज्यांच्याकडे विहीरी नाहीत अशा सर्व अनु.जाती/जमाती/सर्वसाधारण (फेर फारानुसार) लाभार्थी (दिड एकर ते 16 एकर पर्यंत जमीन)

**अर्जासोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.**

1) **स्वत:च्या स्वाक्षरीचा विनंती अर्ज**
2) 7/12 **ची प्रत**
3) **गांव नमुना 8-अ प्रत**
4) **बँक पासबुक ची प्रत**
5) **मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला**
6) **आत्महत्याग्रस्त असल्यास तहसिलदार यांचे प्रमाणपत्र**

**जिल्हाधिकारी यवतमाळ**